
ISSN 2231-573X
UGC Care Listed Journal
तिफण
वर्ष १२ वे अंक १ ला
एप्रिल, मे, जून २०२१
महामानव
डॉ. बाबासाहेब आंबेडकर
अभिवादन विशेषांक

<u>अनुक्रमणिका</u>


| अ.क्र. | प्रकरण | |
|---|---|---|
| 1 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर–युगपुरूष | |
| 2 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि अस्पृश्य | |
| 3 | महाडचा संग्रामः एक पाऊल परिवर्तनाच्या दिशेने | |
| 4 | स्वतंत्र मजूर पक्ष व खोती पध्दतीचे उच्चाटन | |
| 5 | डॉ. आंबेडकरांचे कोल्हापुर संस्थानातील अस्पृश्योध्दाराचे काय | |
| 6 | कुटूंब नियोजन आणि लोकसंख्या नियंत्रणाबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार | |
| 7 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जातीनिर्मुलनविषयक विचार | |
| 8 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर व अमरावती येथील अंबादेवी मंदिर प्रवेश सत्याग्रह | |
| 9 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा खोती पध्दतीविरुध्द लढा | |
| 10 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे शेतकरी व कामगार यांच्या हितासंबंधीचे कार्य | |
| 11 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची सामाजिक लोकशाही | |
| 12 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक न्यायाची प्रासंगिकता | |
| 13 | महिला सक्षमीकरणाात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान | |
| 14 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि स्त्रि मुक्ती | |
| 15 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि हिंदु कोड बिल | |
| 16 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार व कार्य | |
| 17 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार | |
| 18 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार | |
| 19 | भारतीय चलन व अर्थव्यवस्थेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान | |
| 20 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची आर्थिक दृष्टी | |
| 21 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जल नियोजन कार्ये | |
| 22 | दलित नाटक – रंगभूमीची पूर्वपरंपरा व विकास | |
| 23 | **डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची ओजस्वी मराठी लेखन शैली** | |
| 24 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सांसदीय लोकशाहीसंबंधी विचार | |
| 25 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे 'नवयान'– येवला ते नागपूर | |
| 26 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे वृत्तपत्रीय कार्य | |
| 27 | **डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे फाळणीविषयक विचार** | |

## 18. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार

डॉ. संदिप म. राऊत
इतिहास विभाग प्रमुख
भारतीय महाविद्यालय, मोर्शी
ता. मोर्शी, जि. अमरावती

डॉ. बाबासाहेबां आंबेडकरांनी 20व्या शतकात मांडलेले मुलभुत आर्थिक विचार आज 21व्या शतकात खुपमहत्वाचे वाटतात. त्यांचे विचार वाचतानालक्षात येतेतो त्यांचा द्रष्टेपणा 'रुपयाचे विश्लेषण'या कठिण विषयावर त्यांचा प्रबंध वाचला कि, त्यांची अर्थशास्त्रीय प्रतिभा लक्षात येते समाजशास्त्र, राज्यशास्त्र, धर्म, इतिहास, नागरिकशास्त्र, कायदेशास्त्र इ. जीवनोपयोगी विषयाचे विस्तृत ज्ञान असलेल्या बाबासाहेबांना अर्थशास्त्रीयविचार सामाजिक व राजकीय अंगानी मांडता आले. डॉ. अमर्त्य सेन यांनी गरीबांसाठीचे अर्थशास्त्र मांडले. बाबासाहेबांनी हेच गरीबांसाठीचे अर्थशास्त्र तिन्ही अंगानी आपल्यासमोर ठेवले. राजकीय, अर्थशास्त्र, सामाजिक अर्थशास्त्र व धार्मिक (आध्यात्मीक) अर्थशास्त्र असे तीन पैलू बाबासाहेबांनी चर्चिले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक क्रांतीसुत्र बहुआयामी आणि विविध लक्षणीय स्वरुपाचे आहे. डॉ. बाबासाहेबाचे ग्रंथ, कार्य आणि कर्त्यव्याच्या आर्थिक सुत्रातुन विचार केला तर डॉ. आंबेडकर हे विश्वाला प्रकाश देणारा आर्थिक कान्ती सुत्राचा कधिही न मावळणारा सूर्य हे प्रकर्षाने जानवते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे अर्थशास्त्राचे गाढे व्यासंगी होते कोलंबिया विद्यापिठात एम. ए. साठी "प्राचीन भारतीय व्यापार व पी.एच. डी. साठी ही "ब्रिटिश हंदुस्थानातील प्रतिक अर्थव्यवस्थेची उत्कांती" असे त्यांचे विषय होते. तसेच लंडन स्कूल ऑफ इकॉनामिक्स मध्ये डी. एस्सी. साठी त्यांनी 'रुपयाचे प्रश्न' हा प्रबंध लिहला. हिल्टन–यंग कामिशन पुढे त्यांनी दिलेली साक्ष चलनाच्या प्रश्नाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची होती.[1]

भुमीहीन मजुर, लहान जमिनी, खोतपध्दती, महार वतन, सामुदायीक शेती, जमीन महसुल आणि जमीनदाराचे उच्चाटन या विषयावर त्यांनी निरनिराळया वेळी विचार प्रकट केले. भारतीय घटनेवरील भाषणात प्रसंगानुरुप त्यांनी केलेले विवेचन यातुन त्याच्या अर्थशास्त्रीय विचाराचा मागोवा घेता येतो.

भारताच्या सर्वांगिण विकासाचे स्वप्न हे स्वप्नच ठरत आहे. तर शोषणाची व्यवस्था कायम असून देशात गरीबी, बेकारी व विषमता उग्ररुप धारण करित आहे. अशा स्थिति देशाचा, अर्थव्यवस्थेचा कणा मजबुत करण्यासाठी आणि देशाला स्वयंभू व विकसीत करुन देशात आर्थिक समता प्रस्थापित करण्यासाठी आजही देशाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आर्थिक विचाराची नितांत गरज आहे. म्हणुनच त्यांच्या अर्थशास्त्रीय अभ्यासाची व विचाराची ओळख व्हावी या हेतुने हा लेख प्रस्तुत करित आहे.

1. प्रबंधात्मक ग्रंथातील डॉ. बाबासाहेबाचे आर्थिक विचार :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कोलंबिया विद्यापिठाला एम. ए. च्या पदवीकरिता 15 मे 1915 ला "ईस्ट इंडिया कंपनीचे प्रशासन व अर्थव्यवस्था" या विषयावर प्रबंध सादर केला. यात त्यांनी ईस्ट इंडिया कंपनीचे प्रशासन आणि वित्त व्यवस्था कशी होती. त्यांची वैशिष्टे, महसुलाची पध्दत व प्रमाण, मिळणाऱ्या महसुलाचा खर्च इत्यादी बद्दल सविस्तर माहीती दिली आहे. ईस्ट इंडिया कंपनीच्या भारतातील महसुल धोरणाची चर्चा त्यांनी केली आहे. भारतातुन वसुल केलेल्या महसुलातुन मात्र कमी खर्च सर्वसाधारण लोकांच्या कल्याणासाठी केला जातो. त्यामुळे भारतीय लोक विकासापासुन वंचीत राहतात. ब्रिटीश सरकारच्या भारतातील कामगिरीचे विवेचन करतांना डॉ. बाबासाहेब म्हणतात, "भारताने इंग्लंडसाठी केलेले आर्थिक योगदान हे जेवढे थक्क करणारे आहे. तेवढे इंग्लंडने भारतीयासाठी केलेले योगदान विस्मयकारक आहे."[2]

1924 मध्ये डॉ. बाबासाहेबांनी पीएच. डी. पदवी प्राप्त करण्यासाठी कोलंबिया विद्यापिठाला सादर केलेल्या "The Evolution of provincial Finance in british india"याग्रंथामध्ये डॉ. बाबासाहेबांनी स्थानिक स्वराज्य संस्था, त्यावेळेची घटकराज्ये व ब्रिटिश केंद्र सरकार यांच्यातील आर्थिक व्यवहाराची मीमांसा केली आहे.

डॉ. बाबासाहेबांनी "The problem of Rupee" हा प्रबंध ग्रंथ (D.Sc) साठी लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सला सादर केल्यानंतर 1923ला प्रकाशित करण्यात आला. सदर प्रबंधात्मक ग्रंथामध्ये डॉ. बाबासाहेबांनी सन 1800 ते 1893 या कालखंडातील भारतीय चलनाची जडण–घडण कशी होत गेली यांची मिमांसा डॉ. बाबासाहेबांनी केली. सन 1873 नंतर सोने आणि चांदी विनिमयाचा दर स्थिर ठेवणे कठीण झाल्यामुळे देशाचे कसे नुकसान झाले.[3] याविषयी सविस्तर विश्लेषण डॉ. बाबासाहेबांनी यामध्ये केले आहे. आजच्या आर्थिक परीस्थीतीचे अवलोकन केले असता झालेली भाववाढ इत्यादी बाबींवर डॉ. बाबासाहेबांच्या आर्थिक दृष्टीकोनातुन विचार होणे आवश्यक आहे.

**2. डॉ. बाबासाहेबांचे आर्थिक स्वातंत्र्यता व आर्थिक विकास :**

जातीव्यवस्थेच्या अंर्तगत प्रत्येक व्यक्ती आपल्या अनुवांशिक किंवा जातीगत व्यवसाय करण्यात कटीबंध राहतात. जरी त्यांना त्या व्यवसायामध्ये आवड किंवा आकांशा अनुरुप जरी नसले. यामुळे व्यक्तीमध्ये आर्थिक क्षेत्रात उदासिनता व अकार्यक्षमता निर्माण होते. त्यामुळे त्यांची कार्यकुशलता कमी होते. भिन्न–भिन्न व्यवसायावर भिन्न–भिन्न जातीच्या एकाधिकार असल्याने आर्थिक क्षेत्रात स्पर्धेमध्ये अभाव दिसून येतो. तसेच आर्थिक क्षेत्रामध्ये अनुसंधान, उद्यम, प्रशिक्षण या गोष्टीचा सुध्दा विकास होत नाही.

अशाप्रकारे जातीव्यवस्था ही परंपरागत अर्थव्यवस्थाआधुनिक अर्थव्यवस्थेत परिर्वतीत होण्याच्या प्रक्रियेमध्ये आड येते. आज भारतीय अर्थव्यवस्था विकसीत बनण्यामध्ये जो उचांक गाठत आहे. यामध्ये डॉ. बाबासाहेबांनी आर्थिक स्वातंत्र्या संदर्भात आपले विचार मांडून नवी दिशा दिली आहे.4 यावरुन असे दिसून

येते की, जर समतामुलक समाज रचना तयार करायची असेल तर डॉ. बाबासाहेबांनी मांडलेल्याआर्थिक स्वातंत्र्यातुन होवू शकते हे स्पष्ट होते.

3. डॉ. बाबासाहेबांचे शेती विषयक सुधारणा :

डॉ. बाबासाहेब यांचे शेती विषयक विचार व कार्य हे भारताला नवी दिशा देऊन आर्थिक बाबतीत सक्षम बनवणारे आहे. 'स्मॉल होलिंडग्ज इन इंडिया ॲण्ड देअर रेमीडीज' हा लेख सर्वप्रथम"Journal of the Indian economic society, Vol. 1"यामध्ये 1918 मध्ये प्रसिध्द झाला. यामध्ये डॉ. बाबासाहेबांनी शेती विषयक मुलभुत प्रश्न मांडले आहेत. बाहेर देशातील धारण क्षेत्रातील उदा. देतांना ते म्हणतात इंग्लंडमध्ये मोठे धारण क्षेत्र आहे. फ्रान्स मध्ये लहान धारण क्षेत्र आहेत. तसेच हॉलंड आणि डेन्मार्कमध्ये आहेत. मुंबई प्रदेशाचे उदा. देतांना ते म्हणतात, येथील धारण क्षेत्र 25.9 एकरापासून तर पूण्याजवळील पिंपळा सौदागर येथील 1 ते 2 एकरापर्यंत आहे. हि धारण क्षेत्रे भारतीय शेतीकरिता फारच गंभीर बाबा आहे असे म्हटल्या जाते. लहान धारण क्षेत्राबाबत डॉ. बाबासाहेब म्हणतात. "The evils of small holdings are many. The evil of fragmentation are very great and must be met by a comprehensive scheme of consolidation" जमीनीच्या आकारामुळे शेतीच्या उत्पादनावर परिणाम होतो. यावर उपाय सुध्दा डॉ. बाबासाहेबांनी सुचविला आहे. तो म्हणजे 'शेतीचे राष्ट्रीयकरण' होय.[5] सामुदायीक शेती संदर्भात त्यांनी आपले विचार मांडून आदर्श शेती व्यवसायामुळे शेतकरी हा आपले राहणीमान बदलू शकेल हे ते जाणत होते. तसेच डॉ. बाबासाहेबांनी 17 सप्टेंबर 1937 रोजी बॉम्बे विधिमंडळात 'खोती जमीनदारी पध्दती' रद्द करणारे पहिले विधेयक सादर केले. त्यांच्या विचार आणि कार्यामुळे "महार वतन व खोती पध्दत" रद्द करण्या संदर्भात सरकार दरबारी विचार मांडुन रद्द करण्यास भाग पाडले.

4. डॉ. बाबासाहेबांचे कामगारांचे आर्थिक प्रश्ना बाबत कार्य :

भारतातील कामगार वर्गाचे आर्थिक प्रश्न सोडवण्यासाठी डॉ. बाबासाहेब हे सातत्याने संघर्ष करीत राहीलेत म्हणुनच कामगाराची स्वतंत्र्य संघटना असावी असे त्यांना वाटत होते. कारण कामगारामध्ये आपआपसातील वाद भयंकर होते. त्यात जातीवादाने शिरकाव केल्यामुळे अस्पृश कामगाराची स्थिती दयनिय होती. सावकाराच्या तडाख्यात दलित समाज सापडला असल्यामुळे त्यांची परिस्थिती वाईट होती. त्या विरुध्द कामगार पुढाऱ्यांनी आवाज उठवला नव्हता. अस्पृश्य कामगाराचे दोन प्रमुख शत्रू होते भांडवलाशाही व ब्राम्हणशाही म्हणुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात,"कापड विणण्याचे काम स्पृश्यांनी केले काय? किंवाअस्पृश्यांनी केले काय?मालकाला त्यात सुख–दुःख नाही. त्यांचा माल निघाला त्याचा फायदा झाला म्हणजे झाले."[6]गिरणी कारखान्यात कामगारामध्ये जातीभेद असला तरी कारखानदारांचा उद्देश नफा कमावण्याचा आहे. मग तो माल कोणी तयार करत असो. तर गिरणी कामगारांना काहीच

आक्षेप नसे. परंतु कामगारांमध्ये अंतर्गत भेदभावपुर्ण व्यवहार धोकादायक आहे. म्हणुनच अस्पृश्य कामगारांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी न्याय मिळून देण्यासाठी आपले विचार मांडून कार्य केले.

**5. डॉ. बाबासाहेबांचे चलनव्यवस्थे विषयी विचार :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा "रुपयाचा प्रश्न त्याचे मुळ आणि समाधान" पदवीसाठी लिहलेल्या प्रबंधात चलनाविषयी माहिती मिळते. हा ग्रंथ 1923 मध्ये प्रकाशित करण्यात आला. डॉ. बाबासाहेबांनी चलनपध्दतीचा, ग्रामीण अर्थव्यवस्था वस्तुची अदलाबदल करुन व्यवहार चालवण्यापासून ते सोने–चांदी या धातुंचे चलन आणि आजचे कागदी चलन खात्यापर्यंत सांगोपांग व जिज्ञासू प्रवृत्तीने अभ्यास करुन त्यांचा शोध घेवून ग्रंथात अचूक व विस्तृत माहिती दिली. डॉ. बाबासाहेब सांगतात की, ब्रिटीश राजवटी पुर्वी मोगल साम्राज्याच्या आर्थिक व्यवस्थेचा पाया अकबराने घातला. त्या काळापासून भारतात प्रामुख्याने चलन म्हणुन सोने–चांदी किंवा इतर धातुंचा वापर होत असे. तसेच ब्रिटीश पुर्वी राजवटीत नोकरांना आणि सैनिकांना वस्तु स्वरुपाने पगार मिळत असे. ब्रिटीशांनी त्या ऐवजी रोख पैसे देण्यात सुरुवात केली.

डॉ. आंबेडकरांचे तर्कनिष्ठ आणि दृढ मत होते, की जोपर्यंत रुपयाच्या सामान्य क्रयशक्ती मध्ये स्थिरता येत नाही. तोपर्यंत हे चलन स्थिर होण शक्य नाही आणि प्रामुख्याने ही बाब विनिमय प्रमाणामुळे शक्य होत नव्हती. या व्यवस्थेमुळे रोगाचा मुळ कारणाचा शोध घेण्याऐवजी फक्त लक्षणे विचारांत घेवून उपाय केला जात होता. डॉ. बाबासाहेबांनी हे सुचवलेले विचार सत्य आणि मुलगामी होते. [7]

**6. डॉ. बाबासाहेबांचे औद्योगिकरण्या संबंधी विचार :**

औद्योगिकीकरणा संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, "औद्योगिक निती अशाप्रकारे असली पाहीजे की, ज्याच्या परिणाम स्वरुप अधिकतम उत्पादनाची निपुणता आणि उत्पादना बरोबरच आंतरराष्ट्रीय औद्योगिक बाजारामध्ये देशी उद्योग व त्याच्या उत्पादनाची प्रतिस्पर्धा क्षमता प्रतियोगीता पुर्ण आणि लाभकारी असली पाहिजे."

उद्योग क्षेत्रात अशी परिस्थिती कायम राहील्याने देशाचा औद्योगिक आणि आर्थिक विकासामध्ये गुणात्मक संवर्धन होणे संभव आहे. ते पुढे म्हणतात, "कोणतेही राष्ट्र भांडवलशाही असो वा समाजवादी त्यांना उद्योग क्षेत्रामध्ये प्रगती व विकासासाठी हा सिध्दांत वापरावा लागेल."

डॉ. बाबासाहेबांना कांतीकारी औद्योगीक विचाराला अनुसरुन भारताची इंडस्ट्रियल रिजोल्यून पॉलिसी–1956 तयार करुन हे मानवी कल्याणावर त्याचा कोणता परिणाम होतो. या दृष्टीकोनातुन त्यांनी आर्थिक हालचालीचा अभ्यास केला होता. हा अभ्यास संपत्ती किंवा आर्थिक संबंध यांच्या बदलाचा नव्हता, तर माणूस व त्यांची निवड यांच्याशी होता. विशेष म्हणजे सामान्यात न्याय नितीने संपत्तीचे विभागणी करणे हा हेतु त्यांचा विचारा मागे होता.[8]

भारताला सावरायचे असले तर डॉ. बाबासाहेबांच्या आर्थिक विचारावर भर देणे कर्मप्राप्त ठरेल. त्यांच्या या विचार व कार्याला त्रिवार वंदन.

- संदर्भसूची :–


1. कुबेर, वा. ना., डॉ. आंबेडकरः विचारमंथन, सुणावा प्रकाशन, पुणे, आ. 1998, पृष्ठ क. 236.
2. इंगळे, एम. आर., डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक व राजकीय विचार, नभ प्रकाशन, अम, आ. 2011, पृष्ठ क. 20.
3. कित्ता, पृष्ठ क. 28.
4. यादव, वीरेन्द्र सिंह, समता मुलक समाज एवम् सामाजिक परिवर्तन के युग पुरुषः डॉ. भिमराव अम्बेडकर, ओमेगा पब्लिकेशन, दिल्ली, आ. 2011, पृष्ठ क. 329, 330.
5. इंगळे, एम. आर, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक व राजकिय विचार, नभ प्रकाशन, अम, आ. 2011, पृष्ठ क. 31,32.
6. कुबेर,वा.ला., डॉ. आंबेडकर विचारमंथन, सुगावा प्रकाशन, पुणे, आ. 1998, पृष्ठ क. 20.
7. सुर्या,अनिल, डॉ. आंबेडकरांचे आर्थिक, धार्मीक, राजकीय कान्तीसुत्र, प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर, आ. 1998, पृष्ठ क. 24.
8. पासवान सुकन, केवल दलितो के मसिया नही है अम्बेडकर, राजकमल प्रकाशन, नई दिल्ली, आ. 2011, पृष्ठ क. 60.